## नि.दि.दा.क्र.०८/२०२६ मधील नि.क्र.८० वरील आदेश

**०१.** वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ३१ यांचेविरुध्द दाखल केलेल्या तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर निर्णय होईपर्यंत दावा मिळकतीची स्थिती जैसे थे ठेवण्याबाबत आदेश होण्यासाठी प्रस्तुत अर्जाद्वारे वादींनी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते १२, १४ ते १८, १९अ ते १९ब, ३० ते ३१ यांनी प्रस्तुत अर्जावर नि.क्र.८२ नुसार म्हणणे दाखल करून वादींचे कथन नाकारले आहे आणि प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०२.** दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत अर्ज आदेशासाठी ठेवण्यात आला होता व प्रस्तुत खटल्याची नेमलेली तारीख २४/०२/२०२६ अशी ठेवण्यात आली होती. आज दि.१८/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजता वादींतर्फे प्रस्तुत खटला बोर्डावर घेण्यात आला असून नि.क्र.८० वरील प्रस्तुत अर्जावर आदेश तातडीने होण्यासाठी आजरोजी विनंतीअर्ज करण्यात आला असल्याने प्रस्तुत अर्ज आदेशासाठी घेण्यात आला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मौजे देवराष्ट्रे येथील गट क्र.२१२/४ ही जमीन वादींच्या वडीलार्जित मालकी हक्क वहिवाटीची बागायत जमीन असून सदर जमीनीतील पुर्व बाजूचा दक्षिणोत्तर बाजूचा आठ आणेचा हिस्सा वादींच्या मालकी वहिवाटीचा असून त्यामधील वादींच्या पुर्व बाजूच्या आठ आणे हिश्याचा पश्चिम बाजूचा आठ आणे हिस्सा दक्षिणोत्तर पट्टीमध्ये प्रतिवादी क्र.२९ ते ३० यांच्या मालकी वहिवाटीचा होता, वादींचा गट क्र.२१२/४ आणि दावा कलम १ब मध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतींमध्ये पश्चिम अंगास दक्षिणोत्तर लांबीचा सरबांध अगर बांध नव्हता, वादींनी १५ वर्षांपुवी पाईपलाईन करुन गट क्र.२१२/४ मधील त्यांच्या हिश्याच्या जमीनीत पाणी आणून जमीन बागायत केली, त्यासाठी पाईपलाईन व चेंबर काढले आहेत, प्रतिवादी क्र.१ ते २८ यांच्या जमीन मिळकतीमध्ये जाणेयेणेसाठी देवराष्ट्रे ते बलवडी डांबरी रस्त्यापासून उत्तरेस जाणारा १० फुट रुंदीचा असा गाडी रस्ता अस्तित्वात होता, तसेच दावा कलम १ब मध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये येणारा रामापूर गावाकडून ३० फुट रुंदीचा रस्ता होता व त्याची महसुल नकाशामध्ये नोंद होती, तहसिदार कडेगाव यांचेकडील रस्ता केस क्र.६/२०२२ चे न्यायनिर्णयामध्ये दावा कलम १ब मधील जमीन मिळकतीत जाणारे पर्यायी रस्त्यांचा उल्लेख आलेला आहे, तरी देखील प्रतिवादींनी दाखल केलेल्या रस्ता केस/कावि/ एस.आर.४४२/२०२३ मध्ये दि.१३/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये देवराष्ट्रे गट क्र.२१२/४ व गट क्र.२११/४ या मिळकतीच्या मधून पुर्व बाजूने व दावा कलम १ब मध्ये नमूद केलेल्या रामापूर हद्दीतील मिळकतींच्या मधून पश्चिम बाजूने सरहद्दीवरुन शिव रस्ता मंजूर करण्यात आलेला आहे, सदर आदेश बेकायदेशीर असून वादींवर अन्याय करणारा असलेने सदर आदेश रद्दबातल असल्याचे जाहीर होवून मिळण्याकरिता व सदर आदेशाची अंमलबजावणी करु नये, यासाठी वादींनी प्रस्तुत दावा दाखल केला आहे. वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ३१ यांचेविरुध्द दाखल केलेल्या तुर्तातुर्त ताकीदीच्या अर्जावर निर्णय होईपर्यंत दावा मिळकतीची स्थिती 'जैसे थे' ठेवण्याबाबत आदेश होण्यासाठी प्रस्तुत अर्जाद्वारे वादींनी विनंती

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2026.02.18 18:59:41 +0530

केली आहे. प्रतिवादी क्र.१ ते १२, १४ ते १८, १९अ ते १९ब, ३० ते ३१ यांनी कथन केले आहे की, मे.तहसिलदार कडेगाव यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियमाचे कलम १४३ अन्वये दिलेला आदेश हा योग्य व कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करुन दिलेला असल्याने वादींचा प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**०३.** कागदपत्रांचे अवलोकन केलेनंतर असे स्पष्ट होते की, नि.क्र.३/१ वरील गट क्र.२१२/४ च्या ७/१२ उताऱ्यावरून दावा मिळकत गट क्र.२१२/४ ही जमीन वादींच्या नावे असल्याचे व त्यांच्या वहिवाटीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असून मे.तहसिलदार कडेगाव यांचेकडील रस्ता केस/कावि/एस.आर.४४२/२०२३ म्हणजेच क्र.रस्ता/कलम१४३/ एस.आर./०५/२०२३ मधील दि.१३/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये देवराष्ट्रे गट क्र.२१२/४ व गट क्र.२११/४ या मिळकतीच्या मधून पुर्व बाजूने व दावा कलम १ब मध्ये नमूद केलेल्या रामापूर हद्दीतील मिळकतींच्या मधून पश्चिम बाजूने सरहद्दीवरुन शिव रस्ता मंजूर करण्यात आलेला आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर आदेश बेकायदेशीर असून वादींवर अन्याय करणारा असलेने सदर आदेश रद्दबातल असल्याचे जाहीर होवून मिळण्याकरिता व सदर आदेशाची अंमलबजावणी करु नये, यासाठी वादींनी प्रस्तुत दावा दाखल केला असून प्रस्तुत खटल्यात वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ३१ यांचेविरुध्द दाखल केलेला तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज अद्याप युक्तीवादासाठी प्रलंबीत आहे. अशा स्थितीत दावा मिळकत गट क्र.२१२/४ मधील परिस्थीती सध्या बदलली गेल्यास प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरील चर्चेनुसार दिसून आलेल्या परिस्थीतीत, वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी दावा असल्याचे स्पष्ट होत असल्याने न्यायाचा समतोल वादीच्या झुकत असून वादीच्या विनंतीप्रमाणे दावा मिळकतीची 'जैसे थे स्थिती' ठेवण्याचा आदेश न दिल्यास वादींचे पैशात भरून न येणारे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, याकामी मौजे देवराष्ट्रे गट क्र.२१२/४ मधून रस्ता करणेबाबतच्या कार्यवाहीसंदर्भात दोन्ही पक्षांनी 'जैसे थे स्थिती' पुढील तारखेपर्यंत ठेवण्याचा आदेश करणे न्यायोचित ठरेल. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो -

मौजे देवराष्ट्रे गट क्र.२१२/४ मधून रस्ता करणेबाबतच्या कार्यवाहीसंदर्भात दोन्ही पक्षांनी 'जैसे थे स्थिती' पुढील तारखेपर्यंत म्हणजेच दि.२४/०२/२०२६ रोजीपर्यंत ठेवण्याचा आदेश करण्यात येतो.

MADHAVI RAMESH PATKAR
Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2026.02.18 18:59:48 +0530

**स्थळ – कडेगांव**
**दिनांक – १८/०२/२०२६**

**(श्रीम.माधवी र. पाटकर)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव.**